मंगळवार, दि. ५ जानेवारी २०२१




प्रा. डॉ. रोशनआरा शेख यांचा सत्कार करताना प्रकाश टोपे व इतर.

# सावित्रीबाई फुले यांचे विचार आचरणात आणणे गरजेचे : प्रा. डॉ. रोशनआरा शेख

▲ सातारा, दि. ४ : क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांना अभिवादन करताना त्यांचे शैक्षणिक व सांस्कृतिक क्षेत्रातील योगदान व त्यांचे धैर्य हे गुण आजच्या काळातील स्त्रियांनी आचरणात आणले पाहिजेत, असे प्रतिपादन प्रा. डॉ. रोशनआरा शेख यांनी केले.

लोकरंगमंच या नाट्यसंस्थेच्यावतीने टोपे वाडा येथे क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांना अभिवादन करण्यात आले. त्यावेळी त्या बोलत होत्या. प्रारंभी वैशाली राजेघाडगे व प्रा. डॉ. रोशनआरा शेख यांच्या हस्ते सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस पुष्पांजली अर्पण करण्यात आली. यावेळी महाराष्ट्र विद्रोही सांस्कृतिक चळवळीचे उपाध्यक्ष विजय मांडके, संगीत विशारद बाळासाहेब चव्हाण, लोकरंगमंचचे अध्यक्ष सुजित शेख, प्रकाश टोपे, दीपक देशमुख, माधव सोळसकर, अजय मोरे, प्रसाद देवळेकर, शशिकांत गाडे व ॲड. शार्दुल टोपे उपस्थित होते.

विजय मांडके व वैशाली राजेघाडगे यांनी मनोगत व्यक्त केले. लोकरंगमंच संस्थेचे उपाध्यक्ष दीपक देशमुख यांनी संस्थेच्या विविध उपक्रमांची माहिती दिली. सुजित शेख यांनी प्रास्ताविक केले. शशिकांत गाडे यांनी आभार मानले.

ग्रंथपाल
छत्रपती शिवाजी कॉलेज
सातारा. जि. सातारा.

प्राचार्य
छत्रपती शिवाजी कॉलेज
सातारा